## संक्षिप्त

### अर्थसंकल्पाविषयी आज प्रमोद पुराणिक यांचे व्याख्यान

**नाशिक :** वरिष्ठ गुंतवणूक सल्लागार प्रमोद पुराणिक यांचे २४ जुलै रोजी संध्याकाळी साडेपाच वाजता महात्मा नगर येथील ज्येष्ठ नागरिक संघाच्या गणपती मंदिर सभागृहात केंद्रीय अर्थसंकल्प या विषयावर व्याख्यान होणार आहे. अर्थसंकल्पातील नवीन तरतुदी सोप्या शब्दांत उलगडून सांगण्यात येणार आहेत. व्याख्यानासाठी सर्वांना प्रवेश असून या कार्यक्रमास अधिकाधिक संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

### पुरुषोत्तम इंग्लिश स्कूलचा आज गुणगौरव सोहळा

**नाशिक :** नाशिक शिक्षण प्रसारक मंडळाच्या नाशिकरोड येथील पुरुषोत्तम इंग्लिश स्कूल व आरंभ महाविद्यालयाचा विद्यार्थी गुणगौरव समारंभ बुधवारी सकाळी १० वाजता धामणकर सभागृहात होणार आहे. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून शाळेचे माजी विद्यार्थी उद्योजक सुनील जाजू, सनदी लेखापाल आशुतोष झवर उपस्थित राहणार आहेत. अध्यक्षस्थान शालेय समितीचे अध्यक्ष रावसाहेब गायधनी भूषविणार आहेत. यावेळी प्राचार्य उमाकांत वाकलकर, उपप्राचार्या संगिता पवार, पर्यवेक्षक प्रद्युम्न जोशी आदी उपस्थित राहणार आहेत.

### मकरंद फडके यांच्या काव्यसंग्रहाचे प्रकाशन

**नाशिक :** येथील युवा कवी मकरंद फडके यांच्या 'काव्यधनु' या काव्यसंग्रहाचे प्रकाशन अहिर सुवर्णकार समाज कार्यालयात (सोनार वाडा) कवी-गीतकार मिलिंद गांधी आणि समीक्षक प्रा. डॉ. अरुण ठोके यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. श्री सुधा प्रकाशनातर्फे हा काव्यसंग्रह प्रकाशित करण्यात आला आहे. यावेळी निवृत्त अध्यापक प्रदीप कुलकर्णी, प्रकाशक पद्माकर देशपांडे उपस्थित होते. सूत्रसंचालन मधुरा भिडे यांनी केले.

### कृषी पुरस्कारांसाठी प्रस्ताव

**नाशिक :** कृषी विभागामार्फत राज्यात कृषी व संलग्न क्षेत्र तसेच फलोत्पादन क्षेत्रामध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या, कृषी उत्पादन आणि उत्पन्नवाढीसाठी योगदान देणाऱ्या शेतकऱ्यांचा तसेच कृषी विस्तारात बहुमोल कामगिरी करणाऱ्या व्यक्ती, संस्था व गट यांना विविध कृषी पुरस्कारांनी सन्मानित करण्यात येते. त्या अनुषंगाने कृषी आणि संलग्न क्षेत्रामध्ये उल्लेखनीय कार्य केलेल्या जास्तीत जास्त शेतकरी, व्यक्ती, संस्था व गट यांनी पुरस्कारांसाठी आपल्या नजीकच्या तालुका कृषी अधिकारी कार्यालयाकडे लवकरात लवकर प्रस्ताव सादर करावेत, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी विवेक सोनवणे यांनी केले आहे.

# सटाण्यातील महामार्गाचे रुंदीकरण

## अधिकारी, सर्वपक्षीय पदाधिकाऱ्यांच्या बैठकीत निर्णय

लोकसत्ता प्रतिनिधी

**नाशिक :** सटाणा शहरातून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्गाचे जिजामाता गार्डन ते पुष्पांजली चित्रपटगृहापर्यंत २४ मीटर रुंदीकरण करण्यावर सामाजिक संघटना, सर्वपक्षीय पदाधिकारी, कार्यकर्ते आणि अधिकाऱ्यांच्या उपस्थित झालेल्या बैठकीत एकमत झाले.

शहरातून जाणाऱ्या महामार्गामुळे नागरिक वैतागले आहेत. महामार्गाच्या दुतर्फा असलेले अतिक्रमण, विक्रेत्यांच्या गाड्या यामुळे वारंवार वाहतूक कोंडी होत असते. महामार्ग काँक्रिटीकरणाचे काम अतिक्रमण न काढताच सुरु केल्यास आंदोलन करण्यात येईल, असा इशारा शहरातील साई सावली फाउंडेशनने दिला होता. त्यानंतर राष्ट्रीय महामार्ग विभागाच्या वतीने मोजमाप सुरु झाले. अतिक्रमण काढण्यास सुरुवात करण्यात आली. परंतु, दुतर्फा एकसमान माप नसल्याने आंदोलनकर्ते आणि अतिक्रमणधारक यांनी विरोध केल्याने काम थांबविण्यात आले होते. यानंतर सर्वपक्षीय पदाधिकारी, अतिक्रमणधारक आणि आंदोलनकर्ते यांनी राष्ट्रीय महामार्ग विभाग तसेच तहसीलदार यांना निवेदन देत अतिक्रमणधारक आणि सर्वपक्षीय पदाधिकारी यांची बैठक घेण्याची मागणी केली होती.आंदोलनकर्त्यांनीही राष्ट्रीय महामार्ग विभागास निवेदन देत २२ जुलैपर्यंत निर्णय न घेतल्यास आपल्या कार्यालयात आंदोलन करण्यात येईल, असा इशारा निवेदनाव्दारे दिला होता.

बागलाणचे तहसीलदार कैलास चावडे यांच्या दालनात सोमवारी झालेल्या बैठकीस राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे अधिकारी, नगर परिषद अतिक्रमण निर्मूलन मोहिमेचे अधिकारी, सर्वपक्षीय नेते आणि कार्यकर्ते उपस्थित होते. बैठकीत सटाणा शहरातून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्गाच्या प्रलंबित काँक्रिटीकरणाबाबत चर्चा झाली. साक्री-शिर्डी राज्य महामार्गाचे काम पुष्पांजली चित्रपटगृहाजवळ येऊन थांबले आहे. दुसरीकडे सम्राट बिअर बारपासून बस स्थानकापर्यंत दुभाजकाच्या डाव्या बाजूने निम्मा रस्ता काँक्रिटीकरण झाला आहे. बैठकीत रस्त्याच्या दुतर्फा असलेले अतिक्रमण हे मध्यातून दोन्ही बाजूंनी १२ मीटर काढण्यावर एकमत झाले. सध्या सम्राट बिअर बारपासून बस स्थानकापर्यंत रस्त्याचे काँक्रिटीकरण झाले आहे. त्याच्या पश्चिमेकडील विरुद्ध बाजूने थेट बस स्थानकापर्यंत काँक्रिटीकरण करावे आणि पुढे जिजामाता उद्यानापर्यंत रस्त्याचे काँक्रिटीकरण अतिक्रमण काढल्यावर करावे, असा निर्णय सर्वानुमते घेण्यात आला. महिनाभरापासून अतिक्रमण काढावे, या मागणीसाठी बंद पडलेले काँक्रिटीकरणाचे काम आता पुन्हा सुरू होणार असून अतिक्रमणाच्या विळख्यात सापडलेला राज्य महामार्ग मोकळा श्वास घेणार आहे.

यावेळी झालेल्या चर्चेत माजी आमदार संजय चव्हाण, दीपिका चव्हाण, माजी नगरसेवक मनोज सोनवणे, साई सावली फाउंडेशनचे अध्यक्ष प्रशांत कोठावदे, सामाजिक कार्यकर्ते अरविंद सोनवणे, भारतीय जनता युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष मंगेश खैरनार, भारत खैरनार आदी उपस्थित होते.



> शहरातील रस्ता २४ मीटर रुंद ठेवत अतिक्रमणांवर निशाणी करुन ते काढण्याचा प्रस्ताव तयार करण्याबाबत संबंधित विभागाने प्रथमदर्शनी होकार दर्शविला आहे. याबाबत संबंधित विभागाची आवश्यक परवानगी घेतल्यानंतर निर्णय घेण्यात येईल. शहरातील कोणताही रस्ता अतिक्रमण काढल्याशिवाय नव्याने तयार करण्यात येणार नाही, असे बैठकीत ठरले.
>
> – कैलास चावडे (तहसीलदार, बागलाण)

### रहदारी वाढल्याने कोंडीचा त्रास

सटाणा शहरातून महामार्ग गेला आहे. शहराचा विस्तार होण्याआधी या महामार्गावरील वाहतुकीचा फारसा त्रास नागरिकांना जाणवत नव्हता. परंतु, महामार्गालगत दुकाने, व्यापारी संकुले वाढल्याने आपोआपच रहदारी वाढली. त्यात महामार्गावरील वाहतूकीची कोंडी होऊ लागल्याने नागरिकांना त्रास होऊ लागला आहे. शहरवासियांचा हा त्रास दूर करण्यासाठी शहराबाहेरुन महामार्ग नेण्याचा पर्यायही काही जणांकडून मांडण्यात आला होता. आता महामार्ग रुंदीकरणाचा पर्याय स्वीकारण्यात आला आहे.

# पादचारी महिलेचे मंगळसूत्र खेचून पलायन

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

**नाशिक :** रात्री जेवण झाल्यानंतर घराबाहेर फेरफटका मारणाऱ्या पादचारी महिलेचे ४५ हजार रुपयांचे मंगळसूत्र दुचाकीने आलेल्या चोरट्यांनी खेचून नेले. तपोवनातील कृष्णनगर भागात ही घटना घडली.

याबाबत चित्रा वडनेरे (ओम अपार्टमेंट) यांनी तक्रार दिली. वडनेरे दाम्पत्य रात्री जेवण आटोपून शतपावली करण्यासाठी घराबाहेर पडले होते. तपोवन कॉर्नर परिसरातून ते पायी जात असताना नवजीवन रुग्णालयासमोर दुचाकीवर आलेल्या दोघांपैकी एकाने वडनेरे यांच्या गळ्यातील सुमारे ४५ हजार रुपयांचे मंगळसूत्र हिसकावून नेले. या प्रकरणी पंचवटी पोलीस ठाण्यात जबरी चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## गुन्हे वृत्त

### शेड पाडून पाच लाखांचे लोखंड लंपास

अंबड औद्योगिक वसाहतीत कंपनीचे शेड पाडून चोरट्यांनी सुमारे पाच लाख रुपयांच्या लोखंडी पट्ट्या तसेच इतर साहित्य लंपास केले. या प्रकरणी दोन संशयितांना पोलिसांनी अटक केली असून दोन जण फरार आहेत. याबाबत अंजुम जकाणी यांनी तक्रार दिली. संतोष जगताप (आंबेडकरनगर, वरचे चुंचाळे) आणि माधव इंगळे (मारूती मंदिरासमोर, कामटवाडे) अशी अटक केलेल्या संशयितांची नावे आहेत. रिंकल सिंग आणि उन्मेश सिंग हे संशयित पसार झाले आहेत. जकाणी यांनी आपल्या मालकीच्या अंबड औद्योगिक वसाहतीतील भूखंडावर शेड उभारले आहे. संशयितांनी अनधिकृतपणे शेडमध्ये प्रवेश करून ते पाडून टाकले. सुमारे पाच लाख रुपयांच्या शेडचे लोखंडी साहित्य चोरून नेल्याचे तक्रारीत म्हटले आहे. या प्रकरणी अंबड पोलीस ठाण्यात चौघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### युवतीचा विनयभंग

युवतीची वाट अडवून तिघांनी तिचा विनयभंग केल्याची घटना भाभानगर परिसरात घडली. गणेश अहिरे , आझाद शेख आणि संदीप (दोघे भाभानगर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# आंतरराष्ट्रीय टेबल टेनिस स्पर्धेत तनिशा कोटेचाला सुवर्णासह रौप्यपदक

लोकसत्ता प्रतिनिधी

**नाशिक :** सुलेमानिया येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय डब्लूटीटी यूथ कंटेंडर स्पर्धेत नाशिकच्या तनिशा कोटेचाने मिश्र दुहेरीत सुवर्णपदक तर १९ वर्षांखालील मुलींच्या एकेरीत रौप्यपदक पटकावले.



एकेरीच्या अंतिम फेरीत कझाकिस्तानच्या सार्विनोझ मिर्कादिरोवाने ३-१ असा पराभव केल्यामुळे तनिशाला रौप्यपदकावर समाधान मानावे लागले. मिश्र दुहेरीत उत्तर प्रदेशच्या सार्थ मिश्राच्या साथीने जॉर्डनच्या रिनाद अल हसन आणि इसा शमा या जोडीचा ३-० ने पराभव करून सुवर्णपदक पटकावले. तनिशाने लागोपाठ दुसऱ्यांदा आंतरराष्ट्रीय युथ टेबल टेनिस स्पर्धेच्या अंतिम फेरीपर्यंत मजल मारली. तनिशा पाच वर्षांपासून भारतीय कनिष्ठ संघाचे प्रतिनिधित्व करत आहे. तनिशाने आतापर्यंत १५ आंतरराष्ट्रीय पदके मिळवली असून त्यात यूथ जागतिक टेबल टेनिस स्पर्धेतील १९ वर्षाखालील मुलींच्या सांघिक गटाच्या पदकाचा समावेश आहे. नुकतीच तनिशाची निवड प्रतिष्ठित यूटीटी लीग २०२४ साठी बेंगळुरु स्मॅशर्स संघात निवड झाली. या संघात ऑलिम्पिकसाठी भारतीय संघाचे प्रतिनिधित्व करणारी मनिका बात्रा हिच्यासह अनेक आंतराष्ट्रीय खेळाडूंचा समावेश आहे. ती सध्या जय मोडक यांच्या मार्गदर्शनाखाली रोज सहा तास सराव करत आहे.

# शिक्षण क्षेत्रात सद्यस्थितीत मोठी आव्हाने

## संयुक्त पुण्यस्मरण कार्यक्रमात डॉ. सुधीर तांबे यांचे मत

लोकसत्ता प्रतिनिधी

**नाशिक :** सध्या शिक्षण क्षेत्रात मोठी आव्हाने आणि समस्या आहेत. शिष्यवृत्तीची दिरंगाई ही मोठी समस्या होय. प्राथमिक शिक्षणातही मोठी उदासीनता दिसून येते. भारतातून दरवर्षी १५ लाख विद्यार्थी जगभरात शिक्षणासाठी जातात. त्यामुळे आपण एकत्रीतरित्या प्रश्न शासन दरबारी मांडायला हवेत, असे प्रतिपादन माजी आमदार डॉ. सुधीर तांबे यांनी केले.

येथील क. का. वाघ शिक्षण संस्थेतर्फे कर्मवीर काकासाहेब वाघ, रतनशी हरिदास उदेशी तथा काकूशेठ उदेशी आणि सहकार महर्षी माधवराव उर्फ तात्यासाहेब बोरस्ते यांचा संयुक्त पुण्यस्मरण कार्यक्रम सोमवारी झाला. या कार्यक्रमात डॉ. तांबे यांनी,



सद्यस्थितीत शिक्षण संस्थांसमोरील अडचणींकडे लक्ष वेधले. कर्मवीर वाघ यांच्या आठवणींना उजाळा दिला. नाशिक वकील संघटनेचे माजी अध्यक्ष ॲड. दिलीप वनारसे यांची विशेष उपस्थिती होती. माजी महापौर प्रकाश मते हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. ॲड. वनारसे यांनी, कर्मवीर काकासाहेब वाघ हे आजोबा असल्याने त्यांचा करारी बाणा व काम करण्याची पद्धत अनुभवण्याचे भाग्य लाभले, असे सांगितले. काकासाहेब आमदार असतांना त्यांचे राज्यातील नेत्यांपेक्षा दिल्लीतील नेत्यांशी अधिक संपर्क होता, असेही त्यांनी नमूद केले.

मते यांनी, कर्मवीरांनी शिक्षणाचे महत्त्व ओळखून सर्वसामान्य कुटुंबातील मुला- मुलींना शिक्षण उपलब्ध करुन दिल्याचे सांगितले. सध्या विद्यार्थी पालक आणि शिक्षक यांच्यात विसंवाद वाढला आहे. विद्यार्थ्यांनी शिक्षणाबरोबर आपल्या पारंपरिक व्यवसायाचे शिक्षण घेणे गरजेचे आहे. आधुनिक पद्धतीने पारंपरिक व्यवसाय करत रोजगार निर्मिती केली पाहिजे. त्यासाठी प्रसंगी गाव, शहर व राज्य सोडण्याची तयारी असायला हवी, असे मते यांनी नमूद केले. सूत्रसंचालन स्वाती पवार यांनी केले. प्राचार्य प्रा. पी. टी. कडवे यांनी आभार मानले.

# जुन्या पेन्शन योजनेविषयी केंद्राच्या भूमिकेचा कृती समितीतर्फे निषेध

लोकसत्ता प्रतिनिधी

**नाशिक :** जुनी पेन्शन योजना लागू करण्याचा विचार नसल्याचे उत्तर संसदेत सरकारकडून देण्यात आल्याने सरकारच्या या भूमिकेचा सिटू कामगार संघटना आणि कामगार कर्मचारी संघटना संयुक्त कृती समितीतर्फे निषेध करण्यात आला असून आंदोलन तीव्र करण्याचा इशारा दिला आहे.

देशातील राज्य, केंद्र आणि सार्वजनिक उद्योगातील कर्मचारी जुनी पेन्शन लागू करण्याच्या मागणीसाठी सातत्याने संघर्ष करत आहेत.

दरम्यान, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि देवेंद्र फडणवीस यांनी जुन्या पेन्शनबाबत भूमिका जाहीर करावी, अशी मागणी कृती समितीने केली आहे.

# संतांचे स्वप्न संविधानामुळे साकार

## विवेक व्याख्यानमालेत शामसुंदर सोन्नर यांचे मत

लोकसत्ता प्रतिनिधी

**नाशिक :** सातशे वर्षांपासून संतांनी जे आनंदी जगाचे स्वप्न पाहिले ते साकारणारे भारतीय संविधान आहे. संतांनी ज्या विचारांचा जागर या महाराष्ट्रात सात शतके केला त्याच विचारांमुळे अंधश्रद्धा निर्मूलन कायदा झाला, असे प्रतिपादन शामसुंदर महाराज सोन्नर यांनी केले.

येथे डॉ. नरेंद्र दाभोलकर विवेक व्याख्यानमालेत 'संत साहित्यातील संविधान मूल्ये' या विषयावर पुष्प सोन्नर यांनी गुंफले. समता, स्वातंत्र्य, बंधुता, न्याय या मूल्यांचा जागर करत संतांनी आनंदी जगाचे स्वप्न पाहिले. तीच मूल्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय संविधानात समाविष्ट केली आहेत. अमेरिकेत आजपर्यंत राष्ट्राध्यक्षपदी एकाही महिलेला स्थान मिळालेले नाही. भारतात मात्र पंतप्रधान, राष्ट्रपती यांपासून अनेक पदे महिलांनी भूषविली आहेत. हीच भारतीय संविधानाची सर्वसमावेशता आहे. गावकुसाबाहेर राहणाऱ्या संत चोखोबांना अभिव्यक्त होण्याचे माध्यम वारकरी परंपरेतील अभंगांनी दिले. ही एकप्रकारे संविधानातील अभिव्यक्ती स्वातंत्र्याची सुरुवात होती, असे सोन्नर यांनी सांगितले. प्रास्ताविक सचिन मालेगावकर यांनी तर, वक्त्याचा परिचय अरुण घोडेराव यांनी करुन दिला. महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचा परिचय नितीन बागूल यांनी करून दिला. डॉ. शामसुंदर झळके यांनी आभार मानले.

# सिग्नल यंत्रणेविषयी लोको पायलटांना प्रशिक्षण

लोकसत्ता वार्ताहर

**चर्चासत्रात ध्वनिचित्रफितीद्वारे स्वयंचलित सिग्नल यंत्रणेत नॉन सिग्नलिंगमध्ये गाडी चालवताना लोको पायलटच्या कर्तव्यांबद्दल माहिती देण्यात आली.**



**मनमाड :** अत्याधुनिक स्वयंचलित सिग्नल यंत्रणा कार्यरत असताना नॉन सिग्नलिंगमध्ये गाडी चालवताना लोको पायलटने नेमके कसे जागृत राहावयास हवे, याचे नवे तंत्रज्ञान सध्याच्या वाढत्या अपघातांच्या पार्श्वभूमीवर, भुसावळ रेल्वे विभागाच्या प्रमुख इती पांडे यांनी येथे लोको पायलटांना प्रात्यक्षिकांद्वारे शिकविले.

मध्य रेल्वेच्या भुसावळ विभाग मंडळ प्रबंधक पांडे यांनी भुसावळ ते मनमाड दरम्यान विंडो ट्रेलिंगद्वारे केंद्राचे निरीक्षण केले. विंडो ट्रेलिंग निरीक्षणादरम्यान गाडी संचालनाशी संबंधित सर्व सुरक्षा मानकांचे, केंद्र स्वच्छता, रेल्वेमार्ग, पूल यांचे वरिष्ठ अधिकाऱ्यांसह त्यांनी अवलोकन केले. मंडल रेल्वे प्रबंधकांनी मनमाड स्थानकावर चालू असलेल्या कामाचे निरीक्षण केले. यावेळी त्यांनी कामांची पाहणी केली. सध्या प्रवाशांना दिल्या जाणाऱ्या सुविधांविषयी माहिती घेतली. प्रवाशांच्या प्रवासाच्या अनुभवात सुधारणा करण्यासाठी कामांना गती देण्याचे निर्देश दिले. सुरक्षा चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. त्यात भुसावळ विभागातील बहुसंख्य लोको पायलट, सहायक लोको पायलट सहभागी झाले होते. या चर्चासत्रात ध्वनिचित्रफितीद्वारे स्वयंचलित सिग्नल यंत्रणेत नॉन सिग्नलिंगमध्ये गाडी चालवताना लोको पायलटच्या कर्तव्यांबद्दल माहिती देण्यात आली. मनमाडमध्ये अपघात मदत गाडीचे व अपघातानंतर वापरण्यासंबंधीच्या क्रेनचे निरीक्षण करण्यात आले. या निरीक्षणादरम्यान संबंधित शाखेचे अधिकारी, कर्मचारी, लोहमार्ग व रेल्वे पोलीस तसेच कर्मचारी यांनी सहभाग घेतला.

# निपम कार्यकारिणीची बिनविरोध निवड

**नाशिक :** नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ पर्सनल मॅनेजमेंटच्या (निपम) ४३ व्या वार्षिक सभेत निपमच्या अध्यक्षपदी राजाराम कासार तर, उपाध्यक्षपदी विनायक पाटील व राहुल बोरसे यांची निवड करण्यात आली.

जी. पी. फार्मच्या सभागृहात झालेल्या सभेत कार्यकारिणीची बिनविरोध निवड झाली. त्यानुसार मानद चिटणीस म्हणून प्रकाश गुंजाळ तर, सहचिटणीसपदी राजेंद्र आचारी, खजिनदारपदी सुस्मित दळवी यांची निवड करण्यात आली. सदस्य म्हणून मनोज मुळे, गोविंद बोरसे, तुषार मोईम, श्रीकांत पाटील व विनेश मोरे यांना स्थान देण्यात आले. नाशिकच्या औद्योगिक विकासासाठी आणि स्थानिक पातळीवर नवीन उद्योग आणण्यासाठी आपण कार्यरत राहू, असे नवनिर्वाचित अध्यक्ष कासार यांनी सांगितले.

अध्यक्षस्थानी निपमचे माजी अध्यक्ष डॉ. उदय खरोटे होते. प्रारंभी मावळत्या कार्यकारिणीचे सरचिटणीस हेमंत राख यांनी इतिवृत्त वाचून दाखवले.


## जाहीर इशारा नोटीस

तमाम लोकांस या जाहीर इशारा नोटीसीव्दारे कळविण्यात येते की,

**मिळकतीचे वर्णन :-** तुकडी जिल्हा नाशिक, पोटतुकडी **तालुका नाशिक** पैकी **मौजे नाशिक** पैकी **सर्व्हे नं.७०६/१अ/१/११** यांसी **प्लॉट नं.११** यांसी **क्षेत्र २०९-११ चौ.मी.** यांसी आकार रुपये २७६=०२ चौ.मी. या मिळकतीवर बांधण्यात आलेला **बंगला नंबर ११** यांसी **तळ** मजल्यावरील **८१-२०६ चौ.मी. बांधीव क्षेत्र** तसेच **पहिल्या** मजल्यावरील **८४-२०१६ बांधीव क्षेत्र** यांसी **म्यूनिसिपल घर नं.७३३/०४८०/सी/०१० यांसी इंडेक्स नं.४३३०३२०३, बंगला नं.११, अभ्युदय कॉलनी, एस.टी.कॉलनीचे बाजुला, गंगापुर रोड, नाशिक** यांसी **चतु:सिमा** येणेप्रमाणे :- पुर्वेस- प्लॉट नं.१०, पश्चिमेस- एन.डी.सी.सी. कॉलनी, दक्षिणेस- प्लॉट नं.१२, उत्तरेस- वृंदावन कॉलनी.

वरील मिळकत ही **कै.वसंत विठ्ठल मोडक** यांच्या स्वकष्टार्जित मालकी हक्काची असून त्यांच्या निधनानंतर सदर मिळकतीमध्ये त्यांचे कायदेशीर वारस मुलगा म्हणून **श्री.नितीन वसंत मोडक** यांचा **सामायिक व अविभक्त हिस्सा** आहे. दरम्यानच्या काळात श्री.नितीन वसंत मोडक परदेशात असतांना त्यांचे जेष्ठ बंधू **विनय वसंत मोडक** यांनी सदर मिळकतीस खोट्या दस्तऐवजाधारे श्री.नितीन वसंत मोडक यांचा हक्क डावलून इतर वारसांची नांवे मिळकतीच्या रेकॉर्ड ऑफ राईटसला लावून **वित्तीय संस्था व त्रयस्थ व्यक्तींशी संगनमत करुन बेकायदेशीर बोजा लावलेला आहे**. त्याबाबत श्री.नितीन वसंत मोडक यांनी नाशिक येथील दिवाणी न्यायालयात **रे.मु.नं.१८५/२०१९** अन्वये तसेच **सरकारवाडा पोलिस स्टेशन** येथे फौजदारी गुन्हा **एफ.आय.आर.नं.०१२०/२०२३** अन्वये **दिवाणी तसेच फौजदारी दावे दाखल केलेले असून** आज रोजी दिवाणी न्यायालयात प्रलंबित आहे. तसेच फौजदारी गुन्ह्याचा तपास चालू आहे. **अशा परिस्थितीत वर उल्लेख केलेल्या मिळकतीबाबत कोणी कोणत्याही प्रकारचा व्यवहार करु नये**. व्यवहार केल्यास सदरचा व्यवहार श्री.नितीन वसंत मोडक यांचेवर बंधनकारक राहणार नाही. सदर नोटीस **आमचे पक्षकार श्री.नितीन वसंत मोडक** यांचे सांगण्यावरुन लोकहितार्थ आमच्या मार्फत प्रसिध्द. ही जाहीर इशारा नोटीस.

नाशिक. दिनांक - २३/०७/२०२४.

**ॲड.सचिन अ. कुलकर्णी**

एस.ॲन्ड के.लिगल, चारुदत्त चेंबर्स, कान्हेरेवाडी, सी.बी.एस., नाशिक.मो.९७३०८५४२६०



## डेल्टा मॅन्युफॅक्चरिंग लिमिटेड

• **नोंदणीकृत कार्यालय:** बी-८७, एमआयडीसी अंबड, नाशिक - ४२२ ०१०, महाराष्ट्र
• **सीआयएन:** L32109MH1982PLC028280 • **दूरध्वनी क्र.** ९१-२५३-२३८२२३८/६७
• **फॅक्स क्र.** +९१ २५३ २३८२९२६ • **ईमेल आयडी:** secretarial@dmltd.in
• **वेबसाईट:** www.deltamagnets.com

**समभागधारकांना सूचना**
**गुंतवणूकदार शिक्षण आणि सुरक्षा निधी प्राधिकरण (आयईपीएफ) मध्ये समभागांचे हस्तांतरण**

आपणास याद्वारे सूचित करण्यात येते की, माननीय राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण (एनसीएलटी), मुंबई खंडपीठ यांनी त्यांच्या दिनांक २७ डिसेंबर, २०१९ रोजीच्या आदेशानुसार ॲरो टेक्सटाईल्स लिमिटेड, एमएमजी इंडिया लिमिटेड आणि डेल्टा मॅन्युफॅक्चरिंग लिमिटेड (पूर्वीची डेल्टा मॅग्नेट्स लिमिटेड) यांच्या दरम्यान एकत्रीकरण योजना मंजूर केली आहे. ॲरो टेक्सटाईल्स लिमिटेड (एकत्रीकृत कंपनी)च्या सर्व भागधारकांना माननीय एनसीएलटीद्वारे मंजूर प्रमाणामध्ये डेल्टा मॅन्युफॅक्चरिंग लिमिटेडचे समभाग वाटप करण्यात आले आहेत.

वेळोवेळी सुधारीत करण्यात आलेल्या आयईपीएफ (लेखा, लेखापरिक्षण, स्थलांतरण आणि परतावा) नियम, २०१६ (नियम) सह वाचल्या जाणाऱ्या कंपनीज कायदा, २०१३ च्या कलम १२४ च्या अनुषंगाने कंपनीचे समभाग ज्यांच्या लाभांशाचा दावा किंवा प्रदान सलग सात वर्षे किंवा त्यापेक्षा अधिक कालावधीसाठी करण्यात आलेले नाही, त्यांच्यासंदर्भात समभागांचे हस्तांतरण गुंतवणुकदार प्रशिक्षण आणि संरक्षण निधी (आयईपीएफ) प्राधिकरण यांच्याकडे करणे गरजेचे आहे. डेल्टा मॅन्युफॅक्चरिंग लिमिटेडसह एकत्रीकृत झालेल्या ॲरो टेक्सटाईल लिमिटेडच्या बाबतीत, ते समभाग ज्यांचा लाभांशाचा दावा किंवा प्रदान सलग ७ वर्षे किंवा त्यापेक्षा अधिक कालावधीसाठी करण्यात आलेला नाहीत, त्यांच्या हस्तांतरणाची तारीख **शुक्रवार, १ नोव्हेंबर, २०२४** ही आहे. नमूद नियमांच्या अनुषंगाने कंपनी अशा समभागधारकांना ज्यांच्या समभागांचे हस्तांतरण आयईपीएफकडे करणे गरजेचे आहे, त्यांच्याशी वैयक्तिक पत्रव्यवहार करीत आहेत. कंपनीने अशा समभागधारकांचे तपशील संकेतस्थळावर म्हणजेच www.deltamagnets.com वर अपलोड करण्यात आले आहे.

समभागधारकांना याद्वारे अशीही सूचना देण्यात येत आहे की, आर्थिक वर्ष २०१६-१७ च्या लाभांशासंदर्भात दावा /लाभांशाचे प्रदान न झालेले / दावा न करण्यात आलेल्या लाभांशाचा दावा **मंगळवार, २९ ऑक्टोबर, २०२४** पर्यंत करण्यात आल्यास समभागांचे हस्तांतरण आयईपीएफ प्राधिकरणाकडे करण्यात येणार नाही. कृपया नोंद घेण्यात यावी की, नियत दिनांकापर्यंत लाभांशाचा दावा करण्यात आला नाही / प्रदान करण्यात आले नाही तर अशा समभागधारकांच्या समभागांचे हस्तांतरण करण्याची प्रक्रिया कंपनी सुरू करील.

आयईपीएफला लाभांशाचे आणि समभागांचे हस्तांतरण झाल्यानंतर, समभागधारक नियमांनुसार IEPF-5 फॉर्मद्वारे आयईपीएफ प्राधिकरणास निवेदन करून त्यांचा दावा करू शकतात. वरील फॉर्म कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयाच्या संकेतस्थळावर म्हणजेच www.mca.gov.in वर उपलब्ध आहे.

उपरोक्त संदर्भात कोणत्याही चौकशीसाठी समभागधारक कंपनी निबंधक आणि शेअर ट्रान्सफर एजन्ट यांच्याशी खाली नमूद करण्यात आल्याप्रमाणे संपर्क करू शकतात.

**पूर्वा शेअरजिस्ट्री (इंडिया) प्रायव्हेट लिमिटेड**,
युनिट क्र. ९, शिव शक्ती इंड. इस्टेट,
जे. आर. बोरीचा मार्ग, लोअर परेल (पूर्व),
मुंबई - ४०००११; दूरध्वनी: २२ ४९६१ ४१३२
फॅक्स: २२ ३५७० ०२२४
ईमेल आयडी: support@purvashare.com.

**डेल्टा मॅन्युफॅक्चरिंग लिमिटेड करिता**
**सही/-**
**माधुरी देवकर**
**कंपनी सचिव**
**एसीएस क्र. ५४६३१**

**स्थळ: मुंबई**
**दिनांक: २४ जुलै, २०२४**



## ADITYA BIRLA CAPITAL — आदित्य बिर्ला हाऊसिंग फायनान्स लिमिटेड

**नोंदणीकृत कार्यालय :** इंडियन रेयॉन कंपाऊंड, वेरावल, गुजरात ३६२२६६
**शाखा कार्यालय :** आदित्य बिर्ला हाऊसिंग फायनान्स लिमिटेड, तिसरा मजला, रघुकुल संकुल, टकले ज्वेलर्ससमोर, कॉलेज रोड, नाशिक-४२२००५.

१. एबीएचएफएल: प्राधिकृत अधिकारी श्री जिग्नेश जाधव: ९८२३२७१२१३
२. लिलाव सेवा पुरवठादार (एएसपी): मे. ग्लोब टेक इन्फोसिस्टम्स प्रायव्हेट लिमिटेड – श्री. समीर चक्रवर्ती

**अचल मालमत्तेच्या विक्रीसाठी विक्री सूचना**

सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स २००२ च्या नियम ८(६) मधील तरतुदीसह वाचण्यात येणाऱ्या सिक्युरिटायजेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेट्स ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट २००२ अंतर्गत अचल मत्तेच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना.

ज्याअर्थी, **आदित्य बिर्ला हाऊसिंग फायनान्स लिमिटेड**/सुरक्षित धनकोच्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी पुढील कर्जदार व सह-कर्जदारांकडून घेणे असलेल्या सुरक्षित धनकोच्या खाली नमूद थकबाकी आणि तीवरील पुढील शुल्के व खर्चांच्या वसुलीसाठी सिक्युरिटायजेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेट्स ॲण्ड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ मधील अनु. अंतर्गत मागणी सूचना पाठविल्यानंतर पुढील अनामत मत्तांचा ताबा घेतलेला आहे. याद्वारे कर्जदार व सह-कर्जदार आणि सर्व लोकांना सूचित करण्यात येते की, **आदित्य बिर्ला हाऊसिंग फायनान्स लिमिटेड** यांना कर्जदार आणि जामीनदार यांच्याकडून घेणे असलेल्या थकबाकीच्या वसुलीसाठी पुढील मालमत्तांचा **'जशी आहे जेथे आहे', 'जशी आहे जे काही आहे'** आणि **'तेथे जे काही आहे'** तत्त्वावर लिलाव करण्यात येईल.

| अ. क्र. | कर्जदार आणि सह-कर्जदारांचे नाव | मालमत्ता अनामत मत्तांचे वर्णन | मागणी सूचनेनुसार रक्कम | आरक्षित किंमत | बयाणा रक्कम | बयाणा रक्कम जमा करण्याचा शेवटचा दिनांक | पाहणी दिनांक आणि वेळ | ई-लिलाव दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | रोहित जे मोरे, आशा रोहित मोरे, वासुदेव ऑटोमोबाइल्स | सदनिका क्र. २१, तिसरा मजला, श्री गिरीधर अपा., प्लॉट क्र. १, स.क्र. ३११/ई/१, अंबड खुर्द शिवार, पाथर्डी-अंबड लिंक रोड, नाशिक – ४२२०१० | २३.११.२०२३ रोजी रु. १९,१४,४१८/- (रुपये एकोणीस लक्ष चौदा हजार चारशे अठरा फक्त) | रु. १७,६६,६००/- (रुपये सतरा लक्ष सहासष्ट हजार सहाशे फक्त) | रु. १,७६,६६०/- (रुपये एक लक्ष शहात्तर हजार सहाशे साठ फक्त) | ३०.०८.२०२४ | २९.०८.२०२४ रोजी सका. ११.०० ते दु ०४.०० पर्यंत | ३१.०८.२०२४ |
| २. | संतोष संभाजी निकम, वैशाली संतोष निकम, मयूर संतोष पाटील | सदनिका क्र. १४०१, चटई क्षेत्रफळ सुमारे ८८०.८६ चौ.फु. म्हणजे ८१.८३ चौ.मी. (रेरा नुसार), चौदावा मजला, 'आयरिस' श्री४२/ए विंग नावाची प्रभाव इवाना बिल्डींग, बिगर शेती जमीन स.क्र. २१० (काही भाग) आणि २१७ (काही भाग), पाथर्डी गाव, नाशिक महानगरपालिकेच्या हद्दीत, जिल्हा व उप-नोंदणी जिल्हा नाशिक, महाराष्ट्र राज्य. चतुःसीमा: उत्तरेस – मार्जिनल मोकळी जागा, दक्षिणेस – लिफ्ट, पूर्वेस – पूर्वेस – सदनिका क्र. ए १४०२, पश्चिमेस – मार्जिनल मोकळी जागा. | रु. ३८,५२,२७६.००/- (रुपये अडतीस लक्ष बावन्न हजार दोनशे शहात्तर फक्त) | रु. ३६,२७,३२३/- (रुपये छत्तीस लक्ष सत्तावीस हजार तीनशे तेवीस फक्त) | रु. ३,६२,७३२/- (रुपये तीन लक्ष बासष्ट हजार सातशे बत्तीस फक्त) | ३०.०८.२०२४ | २९.०८.२०२४ रोजी सका. ११.०० ते दु ०४.०० पर्यंत | ३१.०८.२०२४ |

विक्रीच्या तपशीलवार अटी व शर्तींसाठी, कृपया आदित्य बिर्ला हाऊसिंग फायनान्स लिमिटेड / सुरक्षित धनको यांची वेबसाइट म्हणजे **https://homefinance.Adityabirlacapital.com/properties-for-auction-under-sarfaesi-act** किंवा म्हणजे **https://BestAuctionDeal.com** येथे दिलेली लिंक पहा.

दिनांक : २४.०७.२०२४
स्थळ : नाशिक

स्वा/- प्राधिकृत अधिकारी
आदित्य बिर्ला हाऊसिंग फायनान्स लिमिटेड